कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) च्या प्रादुर्भावामुळे व तद्‌अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याबाबत.


'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमविनगर, जळगाव-४२५००१

परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग


परिपत्रक क्र. १६०/२०२०

जा.क्र.कबचौउमवि/७-अ /कोव्हीड-१९/उन्हाळी परीक्षा /१६३८/२०२०,

दि. १५ मे, २०२०

**प्रस्तावना:**

कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) च्या प्रादुर्भावामुळे व तद्‌अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठित केलेल्या राज्यस्तरिय समितीच्या अहवालामधील शिफारशी महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केलेल्या असून, त्या संदर्भात महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२३/विशि-३, दि.८ मे,२०२० व मा.शिक्षण संचालक, उ.शि. यांचे पत्र क्र.युएनआय/ २०२०/ बैठक/विशि-१/४१३१A, दि.८ मे,२०२० अन्वये अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक ती उचित कार्यवाही करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना कळविलेले आहे.

**परिपत्रक:**

राज्यस्तरीय समितीच्या अहवालानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कायक्षेत्रातील विद्यापीठ प्रशाळा, शैक्षणिक विभाग, संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था मधील उन्हाळी २०२० च्या परीक्षांना बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन, परीक्षांचे निकाल व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.:-

१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक अंतर राखून, विद्यार्थ्यांची सुरक्षा, आरोग्याचे गांभीर्य व परीक्षांचे पावित्र्य राखून शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत दि. ०१ जुलै ते ३१ जुलै, २०२० दरम्यान खालीलप्रमाणे परीक्षा आयोजित करण्यात येतील.:-

(अ) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षास प्रविष्ठ (Regular/Fresh Admission) असलेल्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्राच्या विषयांसह मागील सत्रातील अनुत्तीर्ण असलेल्या विषयांची परीक्षा (Backlog सह).

(ब) तसेच अंतिम वर्षातील पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची अनुत्तीर्ण असलेल्या विषयांची परीक्षा (Backlog सह).

परीक्षांच्या आयोजनाची पध्दत, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व परीक्षेचा कालावधीबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

२) वरील परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल.

३) वरील परीक्षांसाठी दि. १३ मार्च, २०२० पर्यंत नियमित वर्ग अध्ययनातून पूर्ण झालेला अभ्यासक्रम हा ग्राह्य धरण्यात येईल.

४) विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थितीबाबतची टक्केवारी लक्षात घेता, टाळेबंदीचा कालावधी हा त्या विद्यार्थी/संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

५) कोव्हिड-१९ मुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने सामाजिक अंतर व विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्याचे गांभीर्य लक्षात घेता, **पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अंतीम वर्षातील विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजित करण्यात येणार नसून,** त्यांचा विषयनिहाय निकाल हा ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारीत आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे जाहीर करण्यात येईल.

ज्या अभ्यासक्रमांना वार्षिक परीक्षा पध्दत लागू आहे, अशा अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे जर पूर्वीच्या परीक्षेच्या किंवा सत्राचे गुण उपलब्ध नसल्यास १०० टक्के अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल.

६) ज्या अभ्यासक्रमांचे अंतर्गत मूल्यमापनाचे कामकाज अपूर्ण असेल, किंवा प्रात्यक्षिक परीक्षा, मौखिक परीक्षा, इंटर्नशीप तथा प्रकल्प अहवाल, मौखिक परीक्षा आयोजनाचे कामकाज अपूर्ण असेल, त्या बाबतीत परीक्षेचे आयोजन, अभ्यासक्रमनिहाय मूल्यमापन व गुणदानाबाबतची कार्यपध्दती यथावकाश कळविण्यात येईल.

७) पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अंतीम वर्षातील विद्यार्थी वगळून वरील प्रमाणे परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी या परीक्षेत अनुत्तीर्ण असेल, तरी त्यास पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश " कॅरी फॉरवर्ड " पध्दतीने देण्यात येईल. सदरील सवलत फक्त शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता लागू राहील.

८) उन्हाळी २०२० च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा तसेच प्राप्त श्रेणी /गुणांमध्ये सुधारणा करावयाची असेल तर पुढील शैक्षणिक वर्षात परीक्षा देता येईल.

९) लॉकडाऊनचा कालावधी सुरू झाल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करावयाचे राहून गेले असल्यास, त्यांनी महाविद्यालये/प्रशाळांशी संपर्क साधून विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७अ/माहे मार्च-एपिल-मे-२०२०/प.अ./१६३६/२०२०,दि.१२.०५.२०२० अन्वये दि.२३ मे २०२० पावेतो ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

१०) विद्यार्थ्यांना परीक्षा आणि शैक्षणिक हितासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठांमध्ये व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी शंका निरसन कक्षाची स्थापना अनुक्रमे पत्र क्र.कबचौउमवि/७अ/१६३१/२०२०, दि.०९.०५.२०२० व कबचौउमवि/७अ/१६३७/२०२०, दि.१३.०५.२०२०अन्वये करण्यात आली असून, या संदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

११) पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा आयोजनाबाबत राज्य शासनाकडून काही निर्देश प्राप्त झाल्यास, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२) अभ्यासक्रमनिहाय व सत्रनिहाय आयोजित करावयाच्या परीक्षा व आयोजित न होणाऱ्या परीक्षांचा तसेच निकाल जाहीर करण्याची पध्दत व पुढील वर्गाच्या प्रवेशाबाबतचा तपशिल सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद करण्यात आल्याप्रमाणे राहील. (परिशिष्ट-१)

या परिपत्रकाची प्रत विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Bhatuprasad Prabhakar Patil

Digitally signed by Bhatuprasad Prabhakar Patil
DN: c=IN, o=Kavayitri Bahinabai Chaudhari North Mh. University, ou=Director Board of Examinations and Evaluation, cn=Bhatuprasad Prabhakar Patil, serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483, postalCode=425001, 2.5.4.20=503f3136f4b51bc2496a33245787fa1b54e7924915585cb1e82e24ec8c0baf75, st=Maharashtra
Date: 2020.05.15 16:03:11 +05'30'

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

स्थळ: कबचौउमवि,जळगाव
दि.१५.०५.२०२०

सोबत: परिशिष्ट-१

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१. मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३. मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४. मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५. विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी
६. परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
७. विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
८. समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

## परिशिष्ट-०१.

*परिपत्रक क्र. १६०/२०२०, दिनांक १५ मे, २०२० चे सहपत्र-०१.*

**अभ्यासक्रमानिहाय व सत्रनिहाय आयोजित होणाऱ्या परीक्षा व आयोजित न होणाऱ्या परीक्षांचा तसेच निकाल जाहीर करण्याची पध्दत व पुढील वर्गाच्या प्रवेशाबाबतचा तपशिल:-**

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेशित वर्ष | सत्र | लेखी परीक्षेचे आयोजन जून/ जुलै,२०२० मध्ये होणार आहे का ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | **एक वर्षीय पदविका/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम (One Year Diploma /Certificate Course)** | प्रथम वर्ष | - | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |
| २) | **दोन वर्षीय अभ्यासक्रम (Two Year Course)** | प्रथम वर्ष | द्वितीय सत्र- नियमित (II SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | प्रथम/द्वितीय सत्र- रिपीटर (I / II SEM.- Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | द्वितीय वर्ष | प्रथम/द्वितीय/ तृतीय/ चतुर्थ सत्र- रिपीटर (I/II/III/IV SEM.- Repeater) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |
| | | | चतुर्थ सत्र- नियमित (IV SEM.- Regular/ Fresh) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेशित वर्ष | सत्र | लेखी परीक्षेचे आयोजन जून/ जुलै,२०२० मध्ये होणार आहे का ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **३)** | **तीन वर्षीय अभ्यासक्रम (Three Year Course) (*)** | प्रथम वर्ष | द्वितीय सत्र- नियमित (II SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | प्रथम/ द्वितीय सत्र- रिपीटर (I / II SEM.- Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | द्वितीय वर्ष | प्रथम/द्वितीय/ तृतीय/चतुर्थ सत्र- रिपीटर (I/II/III/IV SEM. -Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात परीक्षा देता येईल. |
| | | | चतुर्थ सत्र- नियमित (IV SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | तृतीय वर्ष | तृतीय/चतुर्थ/ पाचवे/सहावे सत्र- रिपीटर (III/IV/V/VI SEM. Repeater) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |
| | | | सहावे सत्र- नियमित (VI SEM.- Regular/ Fresh) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |

| अ. क्र. | अभ्यास क्रमाचा कालावधी | प्रवेशित वर्ष | सत्र | लेखी परीक्षेचे आयोजन जून/ जुलै,२०२० मध्ये होणार आहे का ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ४) | **चार वर्षीय अभ्यासक्रम (Four Year Course)** | प्रथम वर्ष | द्वितीय सत्र- नियमित (II SEM.-Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | प्रथम किंवा द्वितीय सत्र- रिपीटर (I OR II SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात परीक्षा देता येईल. |
| | | द्वितीय वर्ष | प्रथम/द्वितीय/ तृतीय/चतुर्थ सत्र - रिपीटर (I/II/III/ IV SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | चतुर्थ सत्र- नियमित (IV SEM.-Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | तृतीय वर्ष | तृतीय/चतुर्थ/ पाचवे/सहावे सत्र - रिपीटर (III/IV/V/ VI SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | सहावे सत्र- नियमित (VI SEM.-Regular/Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | चतुर्थ वर्ष | पाच/सहावे/ सातवे/आठवे सत्र - रिपीटर (V/VI/VII/ VIII SEM.-Repeater) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |
| | | | आठवे सत्र-नियमित (VIII SEM.-Regular/Fresh) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेशित वर्ष | सत्र | लेखी परीक्षेचे आयोजन जून/ जुलै, २०२० मध्ये होणार आहे का ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ५) | **पाच वर्षीय अभ्यासक्रम (Five Year Course) (**)** | प्रथम वर्ष | द्वितीय सत्र- नियमित (II SEM.- Regular/Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | प्रथम किंवा द्वितीय सत्र- रिपीटर (I OR II SEM. -Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात परीक्षा देता येईल. |
| | | द्वितीय वर्ष | प्रथम/द्वितीय/ तृतीय/चतुर्थ सत्र - रिपीटर (I/II/III/IV-SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | चतुर्थ सत्र -नियमित (IV-SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | तृतीय वर्ष | तृतीय/चतुर्थ/ पाचवे/सहावे सत्र-रिपीटर (III/IV/V/VI SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | सहावे सत्र-नियमित (VI SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेशित वर्ष | सत्र | लेखी परीक्षेचे आयोजन जून/ जुलै, २०२० मध्ये होणार आहे का ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | **पाच वर्षीय अभ्यासक्रम (Five Year Course) (**) पुढे सुरु . . . .** | चवथे वर्ष | पाचवे/सहावे/ सातवे/आठवे सत्र-रिपीटर (V/VI/VII/VIII SEM.-Repeater) | नाही | विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | | आठवे सत्र-नियमित (VIII SEM.- Regular/ Fresh) | नाही | विषयनिहाय लेखी परीक्षेकरिता (UA) गुणदान करीत असतांना ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारित आणि ५० टक्के लगतच्या सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या आधारे गुणदान केले जाईल. विद्यार्थी पुढील वर्गास प्रवेशासाठी पात्र राहील व अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात देता येईल. |
| | | पाचवे वर्ष | सातवे/आठवे/ नववे/दहावे सत्र-रिपीटर (VII/VIII/IX/X SEM.-Repeater) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |
| | | | दहावे सत्र-नियमित (X SEM.- Regular/ Fresh) | होय | जुलै २०२० मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल. |

**(*)** विधी अभ्यासक्रमाच्या ज्या नियमित सत्राच्या परीक्षा होणार नाहीत, अशा वर्गातील विषयांच्या गुणदान पध्दतीबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

**(**)** Integrated MBA अभ्यासक्रमास तृतीय वर्षास प्रवेशित विद्यार्थी जर तृतीय वर्षानंतर हा अभ्यासक्रम पुढे सुरू ठेवणार नसल्यास, त्याला त्याच्या अनुत्तीर्ण विषयांसह नियमित सत्राची परीक्षा जुलै,2020 मध्ये द्यावी लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यास महाविद्यालयाकडे हमीपत्र सादर करावे लागेल.